नियोजित गडचिरोली विमानतळाच्या उभारणीसाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. मविवि-१२२२/प्र.क्र.१६६/विमान-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. १२ मे, २०२६.

**वाचा :** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.१७४/२८-अ, दि.१०.११.२०१७

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मविवि-१२२२/प्र.क्र.१६६/विमान-२, दि.१३ डिसेंबर, २०२४

३. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे पत्र क्र.मविविकं/२०२६/भू.सं/१९३२, दि.२३.०२.२०२६ व दि.३०.०४.२०२६

४. शक्ती प्रदत्त समितीचे दि.०८.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :**

नियोजित गडचिरोली विमानतळासाठी गडचिरोली तालुक्यातील मौ. मुरखळा, पुलखल, व कनेरी या गावातील जमीनीचे भूसंपादन आणि विकास करण्याकरीता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला अंमलबजावणी यंत्रणा व भूसंपादन संस्था तसेच सदरचे भूसंपादन करण्यासाठी जिल्हाधिकारी गडचिरोली यांना दिनांक १३ डिसेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्राधिकृत करण्यात आले होते.

तद्नंतर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या माहे एप्रिल, २०२५ मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत नियोजित गडचिरोली विमानतळासाठी आणखी दोन-तीन पर्यायी जागांचा विचार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने नव्याने तीन (३) ठिकाणांचा पूर्व व्यवहार्यता अभ्यास तपासण्यांसाठी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांना कळविण्यात आले होते. भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी साइट-३ ( शिरापूर चक, गुरूवळा, हिरापूर आणि राखी) सर्वात योग्य आणि व्यवहार्य असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस कळविले होते. प्रस्तुत प्रकरणी भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांनी तयार केलेल्या मास्टर प्लॅन नुसार भूसंपादनाचा प्रस्ताव तयार करण्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने जिल्हाधिकारी गडचिरोली यांना कळविले होते. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी शिरापूर चक, गुरूवळा, हिरापूर आणि राखी या ४ गावांमधील सरकारी, खाजगी व वन अशी एकूण ३११.८१ हे. आर जमीन संपादित करण्याबाबत प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने नियोजित गडचिरोली विमानतळासाठी शिरापुर चक, गुरूवळा, हिरापूर आणि राखी या गावांमधील सरकारी, खाजगी व वन अशी एकूण ३११.८१ हे. आर जमीन संपादीत

करण्यासाठी रु. १०४,४८,६४,२३९/- खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव मा. मुख्य सचिव महोदय यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीच्या मान्यतेसाठी सादर केला होता. शक्ती प्रदत्त समितीच्या दि.०८.०५.२०२६ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आली असून त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

नियोजित गडचिरोली विमानतळाच्या विकासासाठी मौजे मुरखळा, पुलखल, व कनेरी या गावातील जमीनीचे भूसंपादन करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस अंमलबजावणी यंत्रणा, भुसंपादन संस्था तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली यांना भूसंपादन अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्याबाबत यापुर्वी निर्गमित करण्यात आलेला संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२) नियोजित गडचिरोली विमानतळाकरीता शिरापुर चक, गुरूवळा, हिरापूर आणि राखी या गावांमधील सरकारी, खाजगी व वन अशी ३११.८१ हे.आर. जमीन संपादीत करण्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजित रू.१०४,४८,६४,२३९/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नियोजित गडचिरोली विमानतळासाठी करावयाचे काम | अंदाजित खर्च (रूपये) |
|---|---|---|
| १. | २४५.७५ हे.आर खाजगी जमीनीचे भूसंपादन | रू.७६,९९,७४,७९९/- |
| २. | ३४.६८ हे.आर वन जमीन वळतीकरणासाठी | रू.१०,०७,४५,४००/- |
| ३. | ३१.३८ सरकारी जमीन विनामोबदला हस्तांतरण | -- |
| **अ.** | **एकुण ३११.८१ हे.आर. जमीन (खाजगी+वन+सरकारी)** | **रू.८७,०७,२०,१९९/-** |
| ४. | भूसंपादन कायदा, २०१३ नुसार उपविभागीय अधिकारी यांचा ३% आस्थापना व ३% सोईसुविधा खर्च (अ.क्र. "अ" वर) | रू.५,२२,४३,२१२/- |
| ५. | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचा आस्थापना खर्च ४% (अ.क्र. "अ" वर) | रू.३,४८,२८,८०८/- |
| ६. | प्रकल्प खर्चात होणारी १० % अंदाजित वाढ (अ.क्र. "अ" वर) | रू. ८,७०,७२,०२०/- |
| एकूण | ३११.८१ हे.आर जमीन संपादीत करण्यासाठी एकूण खर्च | रू.१०४,४८,६४,२३९/- |

३) जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी शासकीय ३१.३८ हे. आर जमीन विनामोबदला महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला ३४.६८ हे. आर वनजमीनीचे वळतीकरण सल्लागारामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) वन जमीनीचे वळतीकरण करण्यास वन विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर खाजगी व सरकारी जमीन संपादीत / हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला ३११.८१ हे. आर जमीन संपादनासाठी भूसंपादन संस्था आणि अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. तसेच जिल्हाधिकारी गडचिरोली यांना सदर जमीन संपादनासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

७) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०५१२१७२०१७४५०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

MADHURI ANKUSH JAGTAP

Digitally signed by MADHURI ANKUSH JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=6AB8CB23D7843D6A9B698592C496E433B20C89CEFD5902F163C60E302A52AE5F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=770CBAA936BFFF67CFD6A6ADACAC60BCAEF68567397E2BE9B66123ABA855F513, cn=MADHURI ANKUSH JAGTAP
Date: 2026.05.12 17:22:23 +05'30'

**(माधुरी जगताप)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री(नगर विकास विभाग व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री(राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य याचे स्वीय सहायक,
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
७. अपर मुख्य सचिव(विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई.
९. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१०.अपर मुख्य सचिव, (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई.
११.अपर मुख्य सचिव, (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,मंत्रालय,मुंबई.
१२.अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३.प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.प्रधान सचिव, (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय,मुंबई.
१५.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली.
१६.संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१७.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या, मुंबई
१८.विभागीय कार्यकारी अधिकारी, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (प.क्षे.), मुंबई.
१९.महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२०.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-२५), मंत्रालय,मुंबई.
२१.उप संचालक, विमानचालन संचालनालय, जूहू विमानतळ, मुंबई.
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
२४. निवड नस्ती.